MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



## सादोळा येथे घरात गॅस टाकीचा स्फोट होवून लाखोचे नुकसान

माजलगाव /प्रतिनिधी

तालुक्यातील सादोळा येथील बीट गल्लीतील एका घरात गॅस टाकीचा स्फोट होवून रविवारी संसार उपयोगी वस्तु कपडे दागीने असे लाखोचे नुकसान झाले. रविवारी संध्याकाळी सादोळा गावांमध्ये बीट गल्ली तील गरीब कुटुबांतील भाऊसाहेब खुशालराव सोळंके यांच्या घराला संध्याकाळी (बझ लोरिपू) गॅस चा स्फोट झाला. सुदैवाने काही ही जिवित हानी झाली नाही पण त्यांच्या घरातील मौल्यवान वस्तु, त्यामध्ये दागदागिने, मोबाईल, कपडे, अन्नधान्य, व रोख रक्कम, अशाप्रकारे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे त्यामध्ये ३ तोळे सोने, मोबाईल, रोख रक्कम २५ हजार अशी ४ लाख पर्यंत नुकसान झाल्याचा अंदाज आहे. आता पेरणीचे दिवस असल्यामुळे बियबियाने भरणा करण्यासाठी त्यांनी इकडुन तिकडुन पैसे जमा केले होते त्यामुळे त्यांच्या वर आज घरदाराला सावरण्यासाठी खुप अवघड आहे तरी शासनाने या घटनेचा पंचनामा करून आर्थिक मदत करावी या घटनेमुळे भाऊसाहेब सोळंके यांच्या आई ला खुप मोठा धक्का बसला आहे त्यामूळे प्रशासानाने यांची दखल घेऊन आर्थिक मदत करावी अशी मागणी गावकर्यांनी केली आहे.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०१ अंक -२६० बुधवार दि.१२ जुन २०२४ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -260 TUESDAY DT. 11 JUNE 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

## गुटका, मटका, लँडमाफीयासह बीड जिल्ह्यातील व्यापारीलाईनचे पाचशे कोटी रुपये अडकले दबक्या आवाजात चर्चा?

# पाचशे कोटीपेक्षा जास्त काळा पैसा ज्ञानराधाने पांढरा केला?



**राजकारणी नेते वेगवेगळे माफीच्या यांच कनेक्शन काय आहे ते तपासणे गरजेचे आहे कारण बीड जिल्ह्यातील राजकारणी नेत्यांच्या कामाला ते सदैव अंधारातून हजर असायचे?**



## बीडची शिवाजीनगर शाखा पण केली सील

- सुरेश कुटे यांनी दोन नंबर वाल्यांचा काळा पैसा कसा पांढरा केला ती माहिती बाहेर येणे गरजेचे?
- सुभाष रोड, मोंढा, सह बीड जिल्ह्यातील व्यापाऱ्यांचे तीनशे कोटी त्याची चर्चा दबक्या आवाजात चर्चा .?
- मटका, गुटखा, लँडमाफीयाचे दोनशे कोटीहून जास्त ज्ञानराधात गुंतवला काळा पैसा बीडच्या आर्थिक गुन्हे शाखेने
- सखोल चौकशी करून संबंधित पैसा हा ठेविदारांकडे कुठून आला याची ही चौकशी करणे गरजेचे आहे
- ज्ञानराधातील पाच लाखापेक्षा जास्त किवा कोटीच्या घरात रक्कम आहे. अशा ठेवीदाराची सुद्धा सखोल चौकशी होणे गरजेचे.?

**माजलगांव नंतर आता बीड येथील शिवाजीनगर शाखा पोलीस प्रशासनाने सील केली आहे. त्यामुळे ज्ञानराधाच्या ठेवीदारात एकच खळबळ उडाली आहे.**

**ज्ञानराधाचे सुरेश कुटे सध्या पोलीसांच्या ताब्यात आहेत. नुकत्याच हाती आलेल्या माहितीनुसार ही ठेवीदारांना एक दमडीही न देणाऱ्या सुरेश कुटे ने सोलापूर येथे स्वतःच्या भाच्यास ६०० कोटी दिल्याचे समजते. बीडची शाखा सील झाल्याने ठेवीदारांचा जीव टांगणीला लागला आहे.**

ज्ञानराधा मल्टीस्टेट सह अनेक मल्टीस्टेट मध्ये गोरगरिबांनी आपल्या मेहनतीची एक एक रुपयाची कमाई खेळ म्हणून सुरक्षित राहावी म्हणून ठेवली आहे होती परंतु या सर्व गोरगरिबांच्या तोंडचा घास या ज्ञानराधा असे अनेक पतसंस्थांनी पळवला आहे फक्त आम्ही आज पैसे देऊ उद्या पैसे देऊन अशा फेसबुक वर करून घेईल परंतु यामध्ये भाजी विक्रेते किराणा दुकान मजुरी करून खाणाऱ्या लोकांचे पैसे गुंतलेले असताना यावेळी यांचे पैसे न देता त्यांनी स्वतः पोलीस स्टेशनला हजर होणे पसंत केले असून यामध्ये ज्ञानराजाची सर्व स्वास्थ्य कुठे यांचा समावेश आहे ज्ञानराधा यांनी स्वतःची प्रॉपर्टी विकून गोरगरिबांच्या ठेवीदारांचे पैसे द्यावे म्हणून अनेकांचे दवाखान्याचे काम असतील किंवा मुला मुलीचे लग्न शैक्षणिक कामासाठी संबंधित पैशाचा उपयोग होणार आहे.

बीड शहरातील सुभाष रोडवरील कपडा व्यापारी असतील किंवा अन्य व्यापारी असतील यांच्यासह मोंढ्यातील मोठे मोठे व्यापारी मोठे मोठे बीड जिल्ह्यातील गुत्तेदार यांना प्लॉटिंगचा व्यवहार करायचा दोन नंबरचा नाद आहे. असेच लँडमाफी म्हणून ओळखले जाणारे अनेकभूमाफिया सह यावेळी मटका दारू गुटखा यांचे माफिया यांचे सुमारे ५०० कोटी होऊन जास्त रक्कम ज्ञानराधा मध्ये अडकल्याने सर्वांचे धाबेदनानले आहेत. अशी चर्चा बीड शहरामध्ये ऐकायला मिळत आहे. बीड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय अंतर्गत चालू असलेल्या कारवाई मध्ये यावेळी माजलगाव येथील गुन्हा दाखल झालेल्या या ज्ञानराधा चे सर्वेसर्वा सुरेश कुटे यांची सखोल चौकशी करून बीड जिल्ह्यातील महाराष्ट्रातील सर्व बँकांच्या शाखांमध्ये चौकशी करून सर्व माफीया यांचे दोन नंबरचे पैसे हे कशाप्रकारे पांढरे करायचे हे सत्य नाकारता येत नाही. सुरेश कुटे यावेळी मात्र त्यांच्याकडे सर्वसामान्य पैसे असताना सुद्धा यावेळी लँडमाफी सारखा मोठे मोठे काम असतील राजकारणी लोक असतील गुत्तेदार सहभागी यांचे आहे. काळा पैसा कशाप्रकारे पांढरा व्हायचा याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. तेथील सर्व कर्मचाऱ्यांचे खाते बँकेमध्ये किती होते या सर्वांची माहिती यावेळी जिल्ह्यातील जनतेसमोर घेणे गरजेचे आहे. बीड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय अंतर्गत आर्थिक गुन्हे शाखा बीडने उघडे पाडणे गरजेचे आहे.



## ज्ञानराधाची माजलगाव शाखा केली सील !

बीड/प्रतिनिधी

माजलगाव ज्ञानराधा मल्टीस्टेट पतसंस्थेच्या गैरव्यवहारात दाखल झालेल्या माजलगाव येथील प्रकरणांमध्ये गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून केला जात आहे. ज्ञानराधा सुरेश कुटे आणि आशिष पतसंस्था कटे ग्रुप वरील प्राप्तिकर सुरू आहे. दरम्यान आर्थिक गुन्हे शाखेने सोमवारी माजलगाव येथील ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या मोंढा शाखेला दोन सरकारी पंचांच्या उपस्थितीत सील केले आहे. बीड शहरातील ज्ञानराधा . नऊ महिन्यापासून ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळत नाहीत. यामुळे ज्ञानराधा विरोधात जिल्ह्यात १४ गुन्हे दाखल झाले आहेत. पोलिसांनी पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश कुटे आणि संचालक आशिष पाटोदकर यांना पुण्यातून अटक केलेली आहे. त्यांना १३ जून पर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावलेली आहे. आर्थिक गुन्हे शाखा याप्रकरणी तपास करत आहे. सुरेश कुटे आणि आशिष पाटोदकर यांचे जबाब नोंदवले गेले आहेत तर सोमवारी पोलीस उपनिरीक्षक भारत बर्डे यांच्या पथकाने माजलगावातील मोंढा भागात असलेली ज्ञानराधा पतसंस्थेची शाखा सील केली आहे. या शाखेतील कागदपत्रे, संगणक, सॉफ्टवेअर सुरक्षित रहावे. यासाठी ही शाखा सील करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील दोन नंबर वाल्यांचा काळा पैसा किती आहे याचा आकडा आर्थिक गुन्हे शाखा बीड चौकशी करून जाहीर करावा.

माजलगाव ज्ञानराधा मल्टीस्टेट पतसंस्थेच्या गैरव्यवहारात दाखल झालेल्या माजलगाव येथील प्रकरणांमध्ये गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून केला जात आहे. ज्ञानराधा सुरेश कुटे आणि आशिष पतसंस्था कटे ग्रुप वरील प्राप्तिकर सुरू आहे. दरम्यान आर्थिक गुन्हे शाखेने सोमवारी माजलगाव येथील ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या मोंढा शाखेला दोन सरकारी पंचांच्या उपस्थितीत सील केले आहे. बीड शहरातील ज्ञानराधा . नऊ महिन्यापासून ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळत नाहीत. यामुळे ज्ञानराधा विरोधात जिल्ह्यात १४ गुन्हे दाखल झाले आहेत. पोलिसांनी पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश कुटे आणि संचालक आशिष पाटोदकर यांना पुण्यातून अटक केलेली आहे. त्यांना १३ जून पर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावलेली आहे. आर्थिक गुन्हे शाखा याप्रकरणी तपास करत आहे. सुरेश कुटे आणि आशिष पाटोदकर यांचे जबाब नोंदवले गेले आहेत तर सोमवारी पोलीस उपनिरीक्षक भारत बर्डे यांच्या पथकाने माजलगावातील मोंढा भागात असलेली ज्ञानराधा पतसंस्थेची शाखा सील केली आहे. या शाखेतील कागदपत्रे, संगणक, सॉफ्टवेअर सुरक्षित रहावे. यासाठी ही शाखा सील करण्यात आली आहे.

## आलीशान गाडीमधुन प्रवाशांना लिफ्ट देण्याचे बहाण्याचने लुटून नातेवाईकडुन

# खंडणी वसुल करणारी टोळी स्था.गु.शा.बीड ने उघड करुन दोन आरोपी केले जेरबंद

फिर्यादी नामे बालाजी शंकराव कोंपरे वय ४३ व्य. हेल्थ इंश्युरंस कंपनीमध्ये मॅनेजर नौकरी, रा. वासनगाव तालुका जि.लातुर यांनी पो.स्टे.हडपसर पुणे येथे फिर्याद दिली की, दि.२१/०५/२०२४ रोजी पुणे येथे त्यांचे इंश्युरंस कंपनीचे प्रशिक्षण असल्याने ते कामानिमीत्त पुणे येथे ट्रॅव्हल्सने गेले होते. दिवसभर काम करुन परत लातुरकडे येण्यासाठी हडपसर पुणे प्रवासी स्टॅापवर बसची वाट पाहत थांबले असतांना त्यांचेजवळ एक हुडांई कंपनीचे ओरा कार आली व फिर्यादीने कारला हात करुन लातुरला जायचे आहे असे सांगितले तेव्हा कार मध्ये बसलेल्या तीन इसमांनी त्यांना लातुरकडे जात आहोत असे सांगुन कारमध्ये बसविले. गाडी सोलापुर मार्गे लातुरकडे जात असतांना वाटेतच गाडीत असलेल्या तिघांनी फिर्यादीस मारहाण करुन डोक्याला गावठी पिस्टल लावुन गाडी दौंड मार्गे बीड जिल्हयातील अंमळनेर हद्दीमध्ये नेहुन फिर्यादीकडील पैसे, मोबाईल घेवून फिर्यादीचे मोबाईल वरुन नेट बँकींगद्वारे फिर्यादीकडुन कऊक्रऊ बँकेचे कस्टमर आय.डी.व पासवर्ड घेवुन बँकेकडुन ८,५०,०००/- रु चे लोन मंजुर करुन घेतले व दोन वेगवेगळया -ढच् मधुन ९५,०००/- रु काढुन घेतले व फिर्यादीस आम्ही तुला जिवे मारु असे सांगुन फिर्यादीस त्याचे मित्र दिपक पांचाळ रा.लातुर यास फोनद्वारे मला पैसेची अडचण आहे असे सांगावयास लावुन ७,००,०००/- रु पैशांची मागणी केली. सदरचे पैसे चुंबळीफाटा (पाटोदा) येथे घेवुन येण्याचे सांगितले. फिर्यादीचा मित्र दिपक पांचाळ घेवुन आल्यानंतर यातील आरोपीतांनी सदरचे पैसे घेतल्यानंतर फिर्यादीस अंमळनेर येथे सोडुन दिले व फिर्याद दाखल केल्यास आम्ही तुला जिवे मारु अशी धमकी दिली. वगैरे मंजकुरचे फिर्याद प्रथम पो.स्टे.हडपसर येथे दिली होती त्यानंतर सदर गुन्हयाचे



घटनास्थळ बीड जिल्हयात असल्याने पो.स्टे.अंमळनेर येथे गुरनं ८६/२०२४ क.३९२, ३८४,५०४,५०६,३४ भादंवि सह ३/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये दिनांक ०४/०६/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.सदर गुन्हयाचे अनुषंगाने मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांना मार्गदर्शन करुन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी आदेश दिले होते. सदरचा गुन्हा पोलीस दलासाठी आव्हानात्मक होता. गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.यांनी अभिलेखावरील अशा प्रकारचे गुन्हे करणारे गुन्हेगारांचा विष्लेशण करत असतांना गुप्त बातमी मिळाली की, सदरचा गुन्हा हा १) प्रविण बाबासाहेब काकडे, २) विलास रामा शिंदे दोन्ही रा. गोमळवाडा शिरुर कासार यांनी त्यांचे इतर एका साथीदारांचे मदतीने केला असल्याचे खात्रीलायक बातमी मिळाल्यावरून पो.नि.श्री.संतोष साबळे यांनी आरोपी व गेलामालाचा शोध घेण्यासाठी पोउपनि श्री. श्रीराम खटावकर यांचे पथकास मार्गदर्शन करुन रवाना केले. स्थागुशा पथकाने यातील आरोपी १) प्रविण बाबासाहेब काकडे वय ३२ वर्षे २) विलास रामा शिंदे वय ३२ वर्षे दोन्ही रा. गोमळवाडा शिरुर कासार यांना राहते घरातुन ताब्यात घेवुन गुन्हयाच्या अनुषंगाने सखोल विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे एक साथीदाराचे मदतीने गुन्हा केल्याचे सांगुन गुन्हयात फिर्यादीकडुन मिळालेली रक्कमेपैकी दोघांच्या वाटेला आलेली रुपये ४,००,०००/- जप्त करण्यात आले आहे. गुन्हयाचे तपासादरम्यान सदर आरोपीतांनी अहमदनगर जिल्हयात आणखीन अशा प्रकारचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपी १) प्रविण बाबासाहेब काकडे वय ३२ वर्षे , २) विलास रामा शिंदे वय ३२ वर्षे दोन्ही रा. गोमळवाडा शिरुर कासार यांना पुढील कारवाईकामी पो.ठा. अंमळनेर यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. उर्वरित एक निष्पन्न फरार आरोपींचा स्थानिक गुन्हे शाखा,बीड शोध घेत आहे. सदरची कामगिरी ही मा. श्री.नंदकुमार ठाकुर पोलीस अधीक्षक बीड, मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक, मा.श्री.अभिजीत धाराशिवकर उपविभागीय पोलीस अधिकारी आष्टी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.संतोष साबळे, पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/मनोज वाघ, प्रसाद कदम, पोना/विकास वाघमारे, सोमनाथ गायकवाड, सचिन आंधळे, अश्विनकुमार सुरवसे, चालक/सुनिल राठोड सर्व नेम. स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केलेली आहे.बीड पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी प्रवाशांनी अनोळखी खाजगी वाहतुकीने प्रवास करु नये.

# शासकिय निवासी शाळेत शंभर वृक्षरोपांची लागवड !

### फळ,फुल आणि सावली बरोबर आरोग्याला गरजची वनराई !

शिरूर कासार ।प्रतिनिधी

येथील सामाजिक न्याय विभागातर्गत असलेल्या शासकिय निवासी शाळेत जागतीक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सामाजिक वनिकरणाच्या सहकार्याने शंभर वृक्षरोपांची लागवड करण्यात आली ज्यात फळ,फुल आणि सावलीबरोबर आरोग्याला गरजेच्या असलेल्या वृक्षरोपांचा समावेश आहे . पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी सध्या वनराईचे महत्व प्राप्त झाले आहे ,

भरमसाठ वृक्षतोडीचे विपरीत परिणाम आज पहायला मिळत आहे या परिस्थितीत वृक्षलागवड करणे ही काळाची अत्यंतीक गरज बनली असल्याने वृक्ष लागवड करणे ही प्रतेकाची जबाबदारी आहे . निवासी शाळेच्या मुख्याध्यापिका अस्मिता जावळे यांनी आपल्या शाळेत प्रतीवर्षी हा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना



वृक्षरोपाचे महत्व गळी उतरवण्याचे काम करत असतात याही वर्षी बुधवारी जागतीक पर्यावरणाचे औचित्य साधून सामाजीक वनिकरण विभाग यांच्या सयुक्तिक उपक्रमाद्वारे

फळ फुल सावली आणि आरोग्यासाठी उपयुक्त असलेल्या शंभर रोपांची लागवड केली .यावेळी अस्मिता जावळे सह वनपरिक्षेत्र अधिकारी राजश्री बांगर ,वनरक्षक माने ,तिडके ,शाळेचे कर्मचारी जावळे ,सानप तसेच बाह्यस्रोत कर्मचारी यांचे उपस्थित वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला . वृक्षारोपण ही केवळ औपचारिकता नको म्हणून लावलेल्या रोपांचे संगोपन व संवर्धन देखील करणे गरजेचे असल्याने शालेय शिक्षणाईतकेच महत्व वृक्षसंगोपनावर दिले जात असल्याचे अस्मिता जावळे यांनी सांगितले .

## अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणी सीईओ निता अंधारे विरोधात

# तक्रारीची सहा.आयुक्त नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई कडुन दखल:- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

**बीड शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणी कारवाई न करता स्ट्रक्चरल ऑडिटच्या नावाखाली होर्डिंग्जला वैध ठरवत अनेक वर्षांपासून पालिकेचा कर बुडवणा-या होर्डिंग्ज धारकांची पाठराखण करत उपायुक्त नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांच्या आदेशाची अवमानना करणा-या मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केल्यानंतर त्याची दखल घेऊन सुवर्णा ओगले -शिंदे सहा.आयुक्त(गट -अ) नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांनी सह आयुक्त, उपायुक्त नगर परिषद प्रशासन शाखा विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना सदर प्रकरणाची आपल्या स्तरावरून शहानिशा करून उचित कार्यवाही करण्यात यावी.तसेच केलेल्या कार्यवाहीची एक प्रत संचलनयास तात्काळ सादर करण्यात यावी असे नमुद केले आहे.**

५ अनाधिकृत होर्डिंग्जधारकांच्या आर्थिक फायद्यासाठी सीइओ नीता अंधारे बीडकरांच्या जीवावर उठल्या :- डॉ.गणेश ढवळे

मुंबईच्या घाटकोपर येथील होर्डिंग्जच्या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाल्यानंतर उपायुक्त नगर परिषद प्रशासन संचनालय मुंबई यांनी बीड नगरपरीषदेला शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज हटविण्याचे आदेश दिले होते.तसेच २४ तासात न हटवल्यास फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते.परंतु सीईओ नगर परिषद



बीड निता अंधारेंकडुन बीड शहरातील ९० अनाधिकृत होर्डिंग्ज त्यापैकी १९ होर्डिंग्ज सार्वजनिक ठिकाणी आणि ७१ होर्डिंग्ज घर,ईमारतीवर लावण्यात आल्याचे आढळून आले असुन यापैकी एकाही होर्डिंग्जला नगरषरीषदेची परवानगी नाही. त्यामुळे आजपर्यंत शासनाचा लाखो रूपयांचा कर बुडाला आहे.मात्र संबंधित प्रकरणात कारवाई करण्याऐवजी कर अधीक्षक बीड नगर पालिका विश्वंभर तिडके हे सीईओ नीता अंधारे यांच्या सांगण्यावरून स्ट्रक्चरल ऑडिट करून त्यांना अधिकृत करण्याचा घाट घातला आहे.जवळपास १० वर्षापेक्षाही आधिक काळ बीड शहरातील सोनाजी रमेश, निळकंठ कुलकर्णी (प्रथमेश डिजिटल),शेख हबीब (ट्रीम्स क्रिएशन्स),राम सवासे (निर्मिती ग्राफिक्स),शुभम कोतवाल (एस.के.एडव्हायझर्स) या ५ लोकांच्या अनाधिकृत होर्डिंग्जची पाठराखण करताना दिसत आहे. यापाठिमागे मोठ्या प्रमाणावर आर्थिक साटेलोटे असल्याचे बोलले जात आहे.

# नगररचनातील लाचखोर डोंगरे यास पुनर्नियुक्ती देणाऱ्या देशपांडेस बडतर्फ करा - ॲड. इरफान बागवान

बीड नगर रचना विभागात कार्यरत सहाय्यक नगररचनाकार प्रशांत डोंगरे याच्यावर येळबघाट शिवारातील गट क्रमांक ५८० अ /१ मधील २०.५० आर क्षेत्राचा अकृषी परवाना काढण्यासाठी तक्रारदारास १५ हजार इंजिनीयर व त्याच्या सहाय्यकामार्फत लाच मागण्याच्या प्रकरणात गुन्हा दाखल झाला होता सदरील गुन्ह्यात तब्बल एक महिना फरारी झाल्यानंतर अटकपूर्वजामीन झाल्यानंतर पुन्हा नगर रचना विभागात पहिल्याच जागेवर पुनर्नियुक्ती मिळवण्यासाठी अर्ज केला व त्याच्या एका अर्जावर त्यास नगररचना विभागातील सहाय्यक संचालक सुनील देशपांडे यांनी शासनाचे सर्व नियम पायदळी तुडवून भ्रष्टाचारी प्रशांत डोंगरे यास सोमवार दिनांक १०/०६/२०२४ रोजी नियमबाह्यपणे त्याच्या पूर्वीच्या जागेवर पुनर्नियुक्ती आदेश काढण्यात आले. प्रशांत डोंगरे यांच्यावर यापूर्वी ही भ्रष्टाचाराच्या अनेक तक्रारी वरिष्ठापर्यंत गेलेल्या होत्या परंतु त्याच्यावर कोणतीच कारवाई झालेली नव्हती येळबघाट येथील अकृषी परवाना बाबत प्रशांत डोंगरेसह इंजिनियर निहाल शेख व इंजिनीयरचा सहाय्यक निलेश पवार या तिघांवर लाच लुचपत विभागाने गुन्हा दाखल करून निहाल शेख व निलेश पवार या दोघांना अटक ही करण्यात आली होती तसेच डोंगरे हा या गुन्ह्यात फरारी होता तब्बल एक महिना फरारी झाल्यानंतर डोंगरे याचा अटकपूर्व जामीन झाला त्यानंतर त्याने त्याचे नियुक्ती प्राधिकारी शासन असल्यामुळे व वरील प्रकरणात अनिल पाटील नगररचना विभाग महाराष्ट्र राज्य पुणे यांनी सहाय्यक संचालक नगर रचना बीड यांना तोंडी आदेश देऊन कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले होते परंतु वरिष्ठांच्या आदेशाकडे दुर्लक्षित करून सुनील देशपांडे यांनी भ्रष्टाचाराच्या लातलुतपत विभागाच्या गुन्ह्यात



एक महिना फरारी असणाऱ्या डोंगरे यांच्या एका अर्जावर त्यास पुनर्नियुक्ती आदेश त्याच जागेवर देऊन अशा भ्रष्टाचारी अधिकाऱ्यास पाठीशी घालणाऱ्या सहाय्यक संचालक सुनील देशपांडे यांच्यावर बडतर्फीची कारवाई करण्यात यावी असे निवेदनातून एडवोकेट इरफान बागवान संस्थापक अध्यक्ष टिपू सुलतान युवा मंच यांनी मुख्यमंत्र्याकडे केली आहे.

याबाबतीत येत्या आठ दिवसात सुनील देशपांडे यांच्यावर बडतर्फीची कारवाई करून भ्रष्टाचारी सहाय्यक नगर रचनाकार प्रशांत डोंगरे याची पुनर्नियुक्ती रद्द करून त्याच्या बेकायदेशीर संपत्तीची चौकशी करण्यात यावी नसता टिपू सुलतान युवा मंच महाराष्ट्र तर्फे जिल्हाभर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल याची दखल घ्यावी असे निवेदन एडवोकेट इरफान बागवान यांनी दिले आहे

# केज उपजिल्हा रुग्णालय अधिक्षक लागले पुरस्कार शिफारस विकायला

### जिल्हा शल्यचिकीत्सकाने यांची चौकशी करण्याची मागणी

केज ।प्रतिनिधी

प्रत्येक वर्षी आरोग्य विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्या परिचारीकांना फ्लोरेन्स नाईटिंगल पुरस्कार देऊन गौरव केला जातो.या साठी जिल्हा,ग्रामीण,उपजिल्हा रुग्णालयातून परिचारिकांना पुरस्कार दिला जातो. ज्या रुग्णालयात उत्कृष्ट काम केले जाते अश्या परिचारीकाना हा पुरस्कार दिला जातो यांची शिफारस त्या रूग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक परिचारीकांचा वर्ष भराच काम बघून शिफारस देतात त्या नंतर ते कमिटी कडे पाठवतात त्यातून त्या परिचारिकांना पुरस्कार दिला जातो.

पण केज रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकांना याचा विसर पडला का काहि वेगळ्याच वैशिष्ट्य पुर्ण गोष्टी कडे दुर्लक्ष करून शिफारस केली.कारण केज उपजिल्हा रुग्णालयात दिवस-रात्र सेवा देणाऱ्या अपघात विभाग,प्रस्तुती विभाग,शस्त्रक्रिया विभाग,




लसीकरण विभाग,असे किती तरी विभागात आठ,आठ घंटे काम करणारे अधिपरीचारारिका असताना दिवसात फक्त दोन, तीन घंटे काम करून कधी वार्डात काम न करणाऱ्या परिचारीकांनची शिफारस केली जाते व त्यांना पुरस्कार दिला जातो तो ही एक वेळेस नाहीतर तर दोन दोन वेळेस.

गेल्या वर्षी ज्या अधिपरीचारीकांना हा पुरस्कार भेटला त्यानांच पुन्हा या वर्षी वैद्यकीय अधीक्षक शिफारस करतात व त्यांनाच हे पुरस्कार भेटत असल्याने. या पुरस्काराकडे संशयाने पाहिले जात आहे.वैद्यकीय अधीक्षक जर आपल्या कर्मचाऱ्यांना न्याय देत नसतील तर कर्मचारी कसे प्रोत्साहित होत नसतील असे विकून शिफारशी जर वैद्यकीय अधीक्षक देत असतील तर खरे इमानदारीने आठ घंटे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यावर अन्याय नाही का?

### पंकजाताई मुंडे यांच्याविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोष्ट केल्याप्रकरणी

# गेवराई शहरात निषेध रॅली काढून केली कारवाईची मागणी



गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या लोकनेत्या माजीमंत्री तथा भाजपाच्या राष्ट्रीय सचिव - पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे यांच्या संदर्भात लोकसभेच्या निवडणूकी दरम्यान व लोकसभेचा निकाल लागल्यानंतर देखील काही विकृत मानसिकतेच्या लोकांकडून सोशल मिडीयावर अतिशय खालच्या स्तरावर जावून वैयक्तिक स्वरूपाची टिका केली जात आहे. यामूळे समस्त ओबीसी - भटके विमुक्त समाजात प्रचंड असंतोष पसरला असून दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्या समाज कंटकावर कायदेशीर कारवाई करावी या मागणीसाठी माजी आ.नारायणराव मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी गेवराई शहरात निषेध रॅली काढून मा.तहसीलदार साहेब व पोलिस निरीक्षक गेवराई यांना निवेदन देण्यात आले.

ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते मा.ना.छगनरावजी भुजबळ, लोकनेत्या पंकजाताई मुंडे, ना.धनंजयजी मुंडे, माजीमंत्री आ.महादेव जानकर, आ.गोपीचंद पडळकर यांच्यासह इतर ओबीसी नेत्यांच्या संदर्भात देखील बदनामीकारक पोस्ट टाकल्या जात असून वरील

## भोगलवाडीचे शेतकऱ्यास तेलगाव येथून गावाकडे जात असताना कारी शिवारात

# भोगलवाडी फाट्यावर रस्ता अडवून मारहाण कारण पाइपलाइन लोकांनी का फोडली

दिपक व्यंकट मोरे याने खिशातील मोबाईल व पन्नास हजार लुटले सोबत अनोळखी २२ लोक होते

धारुर ।प्रतिनिधी

दिंद्रुड पोलीस स्टेशन येथे ८ जणांविरोधात गुन्हा नोंद गावात येणारी पाण्याची पाइपलाइन तुमच्या गावातील लोकांनी का फोडली, या कारणावरून कारी येथील वीस ते बावीस जणांनी भोगलवाडीच्या शेतकऱ्यास मारहाण करत खिशातून मोबाइल व ५० हजार रुपये काढून घेतल्याची घटना रविवारी रात्री सात ते आठदरम्यान कारी शिवारात भोगलवाडी फाट्यावर घडली.

भोगलवाडी येथील शेतकरी बाबाराया साहेबराव मुंडे यांना तेलगाव येथून गावाकडे जात असताना कारी शिवारात भोगलवाडी फाट्यावर काही लोकांनी रस्ता अडवलेला




दिसला. त्यांनी तेथे दीपक व्यंकट मोरेसह उपस्थितांना रस्ता का अडवला? अशी विचारणा केली असता, तुमच्या गावातील लोकांनी आमच्या गावात व येणारी पिण्याची पाइपलाइन का फोडली, असे विचारून मारहाण केली. खिशातील १८ हजार रुपयांचा मोबाइल ५० हजार रुपये दीपक मोरे यांनी काढून घेतले, तसेच गावातील जालिंदर तिडके, बळीराम तिडके, राजेभाऊ तिडके यांच्या खताने भरलेले ट्रॅक्टर अडवून खताचे नुकसान करण्याच्या उद्देशाने ट्रॅक्टरवरील ताडपत्री फाडण्यात आली व आलेल्या पावसामुळे खताच्या ८० बॅग व कापसाच्या बियाणांच्या ७० बॅग, असे एकूण १ लाख ८५ हजार रुपयांचे नुकसान केले, तसेच जिवे मारण्याची.धमकी दिली, अशी फिर्याद दिंद्रुड पोलिस ठाण्यात बाबाराया मुंडे यांनी दिली. या तक्रारीवरून दीपक व्यंकट मोरे,बाबूराव फरताडे, नितीन मदन मोरे, कृष्णा लक्ष्मण मोरे, गोविंद हरिभाऊ मोरे, गोपीनाथ मोरे, अंबादास मोरे, बाळू लक्ष्मण मोरे (सर्व रा. कारी) यांच्यावर दिंद्रुड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास सपोनि अण्णाराव खोडेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार सिद्धेश्वर डोईफोडे करत आहेत.

पोलिसांची सतर्कता

दरम्यान, या घटनेनंतर सोमवारी भोगलवाडी येथील एक जमाव दिदुड पोलिसांत संबंधित आरोपींवर गुन्हा दाखल करून आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी करण्यासाठी दाखल झाला होता.

आयपीएस मीना व धारूर ठाण्याचे पोलिस निरीक्षक देवीदास वाघमोडे, दिंदुड ठाण्याचे पोलिस अण्णाराव खोडेवाड यांनी प्रसंगावधान राखत जमावाला शांत केले.

भोगलवाडी व कारी येथील

प्रतिष्ठित नागरिकांची बैठक घेत शांततेचे आवाहन केले.

# लोकशाहीच्या राज्यात

हुकूमशाहीला उत आलाय..!!
सत्तेच्या तमाशाचा फड आत्ता
कुठं संपला.
देश लुटायला सफेद कपड्यातला
पुढारी पुन्हा सज्ज झाला.
लोकशाहीच्या राज्यात
हुकूमशाहीला पुन्हा उत आला..!!
महागाई, बेरोजगारीचा विषय
सोडून देशातली जनता मारतेय
धर्माच्या बाता.
पण गरीब कष्टकऱ्यांच्या मात्र इथ
रोजच पेटत्यात चीता.
पोटाची खळगी भरायला धर्माची
नाय भाकरीची गरज असत्या अन्
म्हणून म्हणतोय आतातरी धर्माची
पाठ सोडा आता..!!
देशातला श्रीमंत भांडवलदार
अधिकच गडगंज झालाय.
अन् मजूर, शेतकरी, कष्टकरी
अजूनही भीकस्पतीच हाय.
अन् युवकांचा मोबाईल
डिवचायचा धंदा मात्र फारमात
चाललाय.
अन् म्हणूनच पुन्हा एकदा
लोकशाहीच्या राज्यात
हुकूमशाहीला मात्र उत्
आलाय..!!
लेखक/कवीसुरज साठे
लोकशाहीर अण्णाभाऊ साठे
जन्मभूमी वाटेगाव
९३७०६२६६१९

# संगीन मज्जिद प्रकरणी वफ्फ बोर्डाच्या कार्यालयासमोर घंटा नाद आंदोलन करणार-वर्षा जगदाळे

बीड ।प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील संगीन मज्जिद इनाम जमिनी बेकायदेशीररित्या खरेदी-विक्री करणाऱ्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने करण्यात आलेली आहे. बीड व छत्रपती संभाजी नगर तसेच मुंबई येथील वफ्फ कार्यालयात पुरावे सहित तक्रार करूनही अधिकारी लक्ष देत नसल्याने बीड येथील वफ्फ कार्यालयासमोर महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने अधिकाऱ्यांची झोप उघडविण्यासाठी घंटानाद आंदोलन करणार असल्याचे महाराष्ट्र निर्माण सेनेच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे.



अंबाजोगाई येथील वफ्फ संस्था मज्जिद संगीन मौजे अंबाजोगाई यांची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र अनुक्रमांक एक पार्ट बी पान क्रमांक ६० व ६१ यामध्ये १९७४ पासून नोंद असून दर्गेचे सेवेसाठी एकूण१० सर्वे नंबर क्षेत्र २७६ एकर १८ गुंठे सेवेसाठी बहाल करण्यात आले होते. सदरील इनाम जमीन काही भूमाफियांनी संगणमत करत स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीर रित्या लाखो रुपयात खरेदी विक्री केलेली आहे. सदरील जमीन खरेदी विक्री प्रकरणी महाराष्ट्र निर्माण सेना मागील अनेक दिवसापासून पाठपुरावा करत आहे. या संदर्भात छत्रपती संभाजीनगर येथील वफ्फ कार्यालयात संबंधित खरेदी विक्रीचे सर्व कागदपत्रे सादर करण्यात आलेली आहे .या गंभीर बाबीची दखल छत्रपती संभाजीनगर येथील वफ्फ अधिकारी घेत नसल्याने येत्या पंधरा दिवसात संबंधित प्रकरणात दोषी असणाऱ्या व्यक्ती विरोधात कायदेशीर कारवाई न झाल्यास महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने बीड येथील वफ्फ कार्यालया समोर महाराष्ट्र निर्माण सेना घंटानाद आंदोलन करणार असल्याचे निवेदनात महाराष्ट्र निर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले आहे.



# मधुकर कुंभारकर यांना पितृ शोक

शिरूर कासार ।प्रशांत बाफना

आर्वी तालुका शिरूर कासार येथील रहिवासी तथा सहशिक्षक मधुकर सुधाकर कुंभारकर यांचे वडील सुधाकर दगडू कुंभारकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे अत्यंत शांत संयमी व धार्मिक वृत्तीचे म्हणून त्यांचा सर्वत्र लौकिक होता त्यांच्या पक्षामध्ये पत्नी एक मुलगा तीन मुली जावई सून नातवंडे असा परिवार आहे पाडळी येथील कैलास बिडकर यांचे ते व्याही होते

# माजी सैनिक अर्जुन वाघमारे यांचे दुःखद निधन अँड.रंजीत वाघमारे यांना पितृशोक

बीड ।प्रतिनिधी

सेवानिवृत्त मिलिट्री मॅन अर्जुन राजाराम वाघमारे वय ८२ यांचे दिनांक ११ जुन २०२४ रोजी पुणे येथील खाजगी रुग्णालयात उपचारांना निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलं दोन मुली सुना नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. ते मनमिळ स्वभावाचे व धम्मकार्यात स्वतःला वाहून घेतले होते. सुपरिचित व्यक्तिमत्व होते. त्याच्या वर अंथरवन पिंपरी येथे अंत्यविधी शेतामधे करण्यात आला. यावेळी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये वकील, डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक, शिक्षक, विविध राजकीय पक्षाचे नेते, सामाजिक संघटनेचे नेते यांनी श्रद्धांजली वाहिली. त्यांचा अंत्यविधी त्यांच्या शेतामध्येच पार पाडण्यात आला. वाघमारे परिवाराच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.



# समाज माध्यमांवर वादग्रस्त वक्तव्य टाळा - अॅड.सुभाष राऊत

बीड ।प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी संपली असून जय पराजयाचा निकाल देखील लागलेला आहे मात्र समाज माध्यमांवर काही युवक बांधवांकडून एखाद्या समाजावर, व्यक्तीवर खालच्या पातळीवर टिका टिपणी करणे अद्याप देखील सुरूच आहे असे केल्याने समाजा समाजात दूही निर्माण होत असून अनेकांची मने दुखावली जात आहेस. असे कोणीही न करता सर्वांनी एकोपा व समजूतदार पणाची भूमिका घ्यावी असे आवाहन दोन्ही उमेदवारांच्या वतीने देण्यात आलेली आहेत याच बरोबर महात्मा फुले समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा सिनेट मेंबर ड. सुभाष (भाऊ) राऊत यांनी देखील असेच आवाहन केले आहे.



मागील काही महिन्यांपूर्वी बीड लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी संपली व निकाल देखील लागलेला आहे. या निवडणुकीच्या काळात अनेक नव तरूणांनी आपल्या पक्षाचा अथवा उमेदवाराचा प्रसार, प्रचार सर्वात जास्त मोठ्याप्रमाणात समाज माध्यमांवर केलेला पाहायला मिळाला होता. मात्र यातीलच काही तरुणांनी प्रचारार्थ जातीचे भांडवल केलेले देखील पहायला मिळाले होते . असेच काहीसे प्रकार आज घडीला देखील बंद झालेले दिसत नाहीत. आज देखील काही युवकांकडून समाज माध्यमांवर जाती वाचक मचकूर टाकून सलोखा, बंधुत्व, संबंध खाराब करण्याची कामे केली जात आहेत असे केल्याने दोन समाजात किंवा दोन वेगवेगळ्या व्यक्तींमध्ये रोशाचे व तिरस्काराचे वातावरण तयार होत आहे . असे प्रकार कोणी समाज माध्यमांवर किंवा प्रत्यक्ष रित्या बोलून करू नयेत व सर्वांनी एकोपा जपावा व तो वाढीस लावावा असे आवाहन समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा सिनेट मेंबर सुभाष (भाऊ) राऊत यांनी केले आहे.

# माजीमंत्री क्षीरसागरांच्या प्रयत्नामुळेच रुग्णालयाला जागा मिळाली- बाबुशेठ लोढा

बीड ।प्रतिनिधी

चौसाळा या ठिकाणी भव्य ग्रामीण रुग्णालय व्हावे यासाठी गेल्या पाच वर्षापासून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे प्रयत्न सुरू आहेत मध्यंतराच्या काळात रुग्णालयासाठी जागा उपलब्ध होत नव्हती ही जागा गायरान जमीन म्हणून अतिक्रमित असताना न्याय प्रविष्ट देखील होती मात्र न्यायालयाने हे अतिक्रमण काढले त्याच वेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी मार्फत पाठपुरावा करून रुग्णालयासाठी पाच एकर जागा उपलब्ध झाली असल्याची माहिती चौसळा येथील बाबूसेठ लोढा, नितीन लोढा अंकुश कळासे,अच्युत मोरे दत्ता नाईकवाडे भारत चौधरी कैलास येडे, दादासाहेब तेलप,दत्तात्रय जोगदंड, सतीश जोगदंड यांनी माजीमंत्री क्षीरसागर यांचे आभार मानले आहेत



चौसाळा ग्रामीण रुग्णालयासाठी यांच्यामार्फत सातत्याने पाठपुरावा सुरू असून या रुग्णालयासाठी जगात उपलब्ध होत नव्हती या ठिकाणी जवळपास १८ एकर गायरान जमिनीवर अतिक्रमण करण्यात आले होते न्यायालयाच्या माध्यमातून हे अतिक्रमण हटवण्यात आले माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत पाठपुरावा केल्यामुळे ग्रामीण रुग्णालयासाठी पाच एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली हा प्रस्ताव मंजुरीस्तव दाखल असून आरोग्य संचालक लातूर यांच्याकडे सादर करण्यात आला आहे हे रुग्णालय झाल्यास चौसाळा आणि परिसरात अनेक गावाचा आरोग्याचा प्रश्न सुटणार आहे या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय व्हावे यासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सातत्याने प्रयत्न केला असून या कामाचे श्रेय इतर कोणीही लाटू नये असे सांगून चौसाळा येथील बाबूसेठ लोढा, नितीन लोढा अंकुश कळासे,अच्युत मोरे दत्ता नाईकवाडे भारत चौधरी कैलास येडे, दादासाहेब तेलप,दत्तात्रय जोगदंड, सतीश जोगदंड यांनी माजीमंत्री क्षीरसागर यांचे आभार मानले आहेत

# अनिलदादा जगताप यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यादिनी बीड वासियांकडून प्रेम शुभेच्छांचा वर्षाव!

बीड ।प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यादिनी जिल्हाभरातून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील मंडळींनी एकत्रित येऊन अनिलदादा जगताप यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा जल्लोषात साजरा केला. काल दि. १० जून रोजी बीड शहरातील हॉटेल नीलकमल येथे शिवसेना पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी, आजी माजी सरपंच, प्रतिनिधि शिवसैनिक यांनी मिळून अनिलदादा जगताप यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्याचे भव्य आयोजन केले होते. दुपारी ३.०० वाजल्यापासून ते उशिरा रात्रीपर्यंत बीड जिल्ह्यासह बाहेरच्या जिल्ह्यातून देखील अनिलदादा जगताप यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मित्रपरिवार मोठ्या संख्येने येत होता. वाढदिवसा दरम्यान अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करत अनिलदादा जगताप यांना आता दादा तुम्ही आमदार व्हावेत, अशी आमची आणि अवघ्या बीड मतदार संघाची इच्छा असल्याचे व्यक्त केले. याप्रसंगी शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षा सौ ज्योतीताई मेटे यांनी देखील उपस्थित राहून अनिलदादा



जगताप यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी शुभकामना केली. अनिलदादा जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व धर्मीय धर्मगुरु, संत-महंत, साधू, महाराज यांनी देखील उपस्थित राहून शुभेच्छा आशीर्वाद दिले. याबरोबरच विविध पक्षातील पदाधिकारी, प्रतिनिधी, वकील संघ, व्यापारी संघ आणि प्रशासकीय अधिकारी, महिला भगिनी, बालकांपासून ते थोर मोठ्यांनी उपस्थित राहून अनिलदादा जगताप यांचे अभिष्टचिंतन केले. अनिलदादा जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हाभरातील विविध तालुक्यातील शिवसैनिकांनी सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले होते. अनेक गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. याबरोबरच अनिलदादा जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त अनाथ आश्रमांना आर्थिक साहाय्य देखील करण्यात आले.

आपल्या शुभेच्छा वर्षावाने आनंद असमंतात पोहचला- अनिलदादा जगताप

आयुष्याच्या प्रवासात विविध वळणावर मिळालेल्या गोड माणसांच्या पवित्र भावनांनी यंदा माझा वाढदिवस नाही तर आनंद सोहळा साजरा केल्याची अनुभूती आली. यंदाच्या शुभेच्छा वर्षावाचा आनंद असमंतात पोहचला आहे. सर्वधर्म धर्मीय धर्म गुरु, संत महंत, महिला भगिनी तथा विविध क्षेत्रातील मित्रपरिवाराने माझ्या वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्यादिनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. याबरोबरच लहान-थोरांपासून प्रत्येकाने सोशल मीडिया, फोन कॉल तर प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा, आशिर्वाद दिले. वाढदिवसाच्या आनंद सोहळ्यात मोलाच्या हितदायी शुभेच्छा देणाऱ्या प्रत्येकाच्याच ऋणात सदैव राहील कारण केवळ आपल्या सर्वांच्या शुभेच्छा आशीर्वादामुळेच आयुष्य सोनेरी क्षणांनी उजळलेले आहे. इथून पुढेही असेच आपले प्रेम, शुभेच्छा, आशीर्वाद आणि साथ माझ्या सोबती असुद्या अशी अपेक्षा करत आपल्या सर्वांचे कृतज्ञपूर्वक आभार मानतो.



आज शिवसेना भवन मुंबई येथे राज्यातील सर्व जिल्हाप्रमुख यांची महत्त्वाची मिटींग शिवसेनेचे पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली पार पडली व सर्व जिल्हा प्रमुख यांनी लोकसभा निवडणुकीत चांगली जिम्मेदारी निभावली त्याबद्दल जिल्हा प्रमुखांचे विशेष अभिनंदन केले व येणाऱ्या निवडणूकाला सामोरे जाण्यासाठी आपल्या आपल्या जिल्ह्यामध्ये शिवसेनेचे जास्तीत जास्त आमदार करण्यासाठी व्युहरचना करावी आसे आदेशीत केले.त्याच प्रमाने शेतकरी कष्टकरी, उपेक्षित वंचित समाजासाठी व सामान्यातील सामान्य लोकांच्या अडी अडचणी सोडविण्यासाठी शिवसेना संघटना जिल्हाभरात मजबूत करावे आसे आव्हान केले.या प्रसंगी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी बीड जिल्ह्याचा वतीने लोकसभेचा आढाव मांडला व या निवडणुकीत बीड जिल्हा शिवसेनेचे महत्त्वाची भूमिका बजावली व सर्व सामान्य मतदारांने महाविकास आघाडीच्या बाजूने कौल दिला व विजयश्री खेचून आणली त्याबद्दल सर्व पदाधिकारी व शिवसैनिक कार्यकर्ते यांचे अभार मानले.आणी यापुढे बीड जिल्ह्यातील शिवसेना सर्व मतदारसंघात आपली ताकद निर्माण करेल व सर्वची सर्व जागा लढविण्यासाठी युव्हरचना करेल व महाविकास आघाडी कायम राहील्यास जिल्ह्यातील जास्तीत जास्त जागा महाविकास आघाडीच्या निवडून आणण्यासाठी प्रयत्नशील राहील आसे सांगितले. यात्प्रसंगी शिवसेनेचे सचिव अनीलजी देसाई साहेब नवनिर्वाचित खासदार झाले म्हणून त्यांना शुभेच्छा दिल्या याप्रसंगी उपस्थित आदित्य ठाकरे साहेब,खासदार संजयजी राऊत साहेब, दिवाकर रावते साहेब, विनायक राऊत साहेब, मिर्लेकर साहेब,नेरुळकर साहेब,वरूणजी सरदेसाई साहेब व सर्व जिल्हा प्रमुख उपस्थितीत होते.... जय महाराष्ट्र..!!

# एस के एच येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा वर्धापन दिन साजरा




बीड ।प्रतिनिधी

येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २६ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यापीठ ध्वजाचे प्राचार्य महेंद्र गौशाल यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे गीत वाजवण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल,डॉ.रत्ना क्षीरसागर, डॉ. द्यानेश्वर जोशी डॉ. शहापूरे तसेच आकाश पाचंगे यांच्यासह विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे शुक्रवारपासून भव्य अखंड हरिनाम सप्ताह

गेवराई : मराठवाड्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे सद्गुरु संत श्री वै. ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या द्वितीय तपपुर्ती सोहळ्यानिमीत्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व संत माऊली दादा कृपांकीत गुरुदास भावरत्न कथाकार ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या रामकथेचे आयोजन करण्यात आले असुन रामकथा व किर्तन सोहळ्याचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री संतचरण रज माऊली भक्त वृंद व ह.भ.प. तपोनिधी शांतीब्रम्ह गुरुवर्य महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांनी केले आहे.

विसाव्या शतकातील महान संत विभूती सदगुरू संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडीकर यांच्या द्वितीय तपपुर्ती सोहळ्या निमीत्त श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे भव्य दिव्य अखंड हरीनाम सप्ताह व ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांची रामकथेसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प. समाधान महाराज शर्मा रामकृष्ण परमहंस परिवार केज यांच्या ओजस्वी वाणर्णीतुन दुपारी २ ते ५ रामकथेचे आयोजन करण्यात आलेले आहे तसेच दि.१४ जुन शुक्रवारी रात्रौ ८:३० ते १०:३० या वेळेत ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे (बंकटस्वामी मठ, श्रीक्षेत्र नेकनुर) यांचे किर्तन, शनिवार दि.१५ जुन ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले संत पिठाचार्य पैठण तथा राष्ट्रीय अध्यक्ष अ.भा.वा. मंडळ यांचे किर्तन, दि.१६ जुन रोजी धर्मगुरु ह.भ.प.अमृताश्रम स्वामी महाराज जोशी श्रीक्षेत्र नवगण राजुरी यांचे किर्तन, दि. १७ जुन सोमवारी प्रेममुर्ती महंत ह.भ.प.



शिवाजी महाराज श्रीक्षेत्र नारायणगड यांचे किर्तन, दि. १८ जुन मंगळवारी व्याकरणाचार्य ह.भ.प. अर्जुन महाराज लाड श्री संत भगवान बाबा वा.शि. सं.श्रीक्षेत्र होळ यांचे किर्तन, दि.१९ जुन बुधवारी भागवताचार्य ह.भ.प. पदमाकर महाराज देशमुख अमरावती यांचे किर्तन, दि. २० जुन ज्ञानसिंधु ह.भ.प. संदीपान महाराज हसेगावकर अध्यक्ष श्री जोग महाराज वा. शि.सं.आळंदी यांचे किर्तन, तर शुक्रवार दि.२१ जुन रोजी वटपोर्णिमेच्या दिवशी वारकरी संपद्राय भुषण रामायणाचार्य ह.भ.प. रामरावजी महाराज ढोक नागपुरकर यांचे सकाळी १० ते १२ वा. अमृततुल्य काल्याचे किर्तन होईल.तद्नंतर महाप्रसादीक महापंगती होतील. या भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहासाठी महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक, वादक, वारकरी, टाळकरी, तसेच गुणीजन मंडळी आपली सेवा देणार आहेत तरी भाविक भक्तांनी या अमृतमय कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संत वै.ज्ञानेश्वर माऊली महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडी, संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# लग्नानंतरची प्रेमकथा.....

वयाच्या वीसाव्या वर्षी माझं लग्न ठरलं, त्यावेळी माझी लग्न करायची अजिबात इच्छा नव्हती. स्थळ तसं खूप चांगल होतं शिवाय आई बाबांची इच्छा. खूप गोंधळ उडाला होता आजवर माझ्या सर्व इच्छा पुर्ण करणारे माझे आई बाबा आज माझ्या इच्छेचा विचार का नाही करत आहेत? खर सांगायच तर माझं होणार सासर कोणालाही हेवा वाटेल असच होतं. माझा होणारा नवरा निशिकांत चोवीस वर्षांचा, राजबिंडा शिवाय पोलिस सब इंन्स्पेक्टर त्यात एकुलता एक. सासू सासरे असं छोटसं कुटुंब. लग्न डिसेंबरलाच ठरलं तारीख मार्च ची निघाली. किती लवकर करतायत माझं लग्न या विचारांनी आई बाबांचा फार राग यायचा त्याहुन जास्त राग त्या निशीकांतचा ज्याने बघताच क्षणी मला होकार दिला. लग्न ठरल्या नंतर तिस-याच दिवशी निशीकांतचा मला फोन आला. काय बोलावे मला काहीच कळत नव्हते. तेच बोलत होते. तसे ते बोलण्यावरूण खूप समजुतदार, बोलके, प्रेमळही वाटले. तरीहि मला वाटायचं एका बोलण्यावरुण कधी कोणाचा स्वभाव कळतो का? त्यांनी मला लग्नाविषयीची माझी इच्छा विचारली मी ही स्पष्ट सांगीतलं मला नाही करायचं इतक्यात लग्न मी तुम्हाला कसलीच ओळखत नाही. आई बाबांची इच्छा म्हणून मी हो बोलले. त्यानंतर आमच्यातलं बोलणं मी आईला सांगितलं. ती खूप चिडली आणि तिने निशीकांतला फोन केला मी केलेल्या मुर्खपणाची माफी मागितली. खरं तर माझा त्यांना दु:खवण्याचा मुळीच हेतू नव्हता. मी फक्त माझ्या ट्रु फिलिंग्स त्यांना सांगितल्या. माझा जो काही गोंधळ उडला आहे तो त्यांना कळायला नको का? दुस-या दिवशी निशीकांत मला भेटण्यासाठी घरी आले.

मी घरात साधासा ड्रेस घालुण बसले होते. दारावर बेल वाजली आई कामात होती दरवाजा मीच उघडला. त्यांना बघितल्यावर मी आईला आवाज दिला. आई बाहेर आली की झाली तीची पाहुण्यांचा आदरातिथ्य करायला सुरुवात. अरे या या या बसा ना असं म्हणून आईने त्यांना पाणी आणुन दिले आणि माझ्यावर ओरडली आधी ते कपडे चेंज करुन ये. मला फार राग आला, आता हे काय भलतच हा कधीहि येणार मग मी काय साडी नेसून बसु काय घरात? मग नशीब तेच म्हणाले आई राहुद्या काही हरकत नाही मी असा अचानक आलो खरतरं माझचं चुकलं, मी आधी सांगायला हवं होतं. त्यावर आई म्हणाली असूद्याहो त्यात काय तूमचंच घर आहे आता हे. आई ने विचारलं कसं काय येणं केलं? त्यावर ते म्हणाले, तुमची हरकत नसेल तर मला माधुरी सोबत थोडं बोलोयचं आहे. आई म्हणाली छे हो हरकत कसली तूम्ही दोघें बोलत बसा मी चहा बनवुन आणते. तितक्यात निशीकांत म्हणाले आई चहा घेत नाही मी कॉफी कराल? मला थोडं आश्चर्यच वाटलं कारण मलाही चहा नाही कॉफीच आवडते. तसा माझाही स्वभाव मोकळाच होता पण न जाणे का मला त्यांच्या समोर मोकळं होताच येत नव्हतं. मी सुंभा सारखी अजुनही दरवाजातच उभी होती. निशीकांत म्हणाले माधुरी आत ये तुझचं घर आहे. मी दरवाजा बंद करुन थोडी आत आले. माझी काहिही बोलण्याची हिम्मत होईना. मग काय तेच बोलले, तुमच्या घराला गच्ची आहे? मी हं, असं उत्तर दिलं. मग त्यांनी चल ना आपण गच्चीवरच जाऊन बोलुया असा हुकूमच सोडला माझ्यावर.

संध्याकाळची वेळ होती आजवर या घराची प्रत्येक संध्याकाळ मी गच्चीवरच घालवली होती. सुर्यास्ताची वेळ तर माझी खूप आवडीची यावेळी आकाशात होणारे रंगांचे बदल मला फार आवडायचे. आजवर माझी सूख दु:ख आयुष्याचे महत्वाचे निर्णय मी याच रंगांच्या साक्षीने घेतले होते. त्यानंतर आम्ही गच्चीवर गेलो. निशिकांत म्हणाले किती सुंदर वाटते ना, हि वेळ मला फार आवडते. संध्याकाळ झाली कि, असं गच्चीवर येऊन आकाशात बदलणारे रंग पहायला. मी आश्चर्याने त्यांच्याकडे पहातच राहिली. किती साम्य होतं आमच्या दोघांत. ते म्हणाले काय झालं अशी का बघत आहेस ? अच्छा ते सर्व जाऊदे मी ज्या कारणा साठी आलो आहे ते बोलु ओके मी विचारलेल्या प्रश्नांची खरी खरी उत्तरे देशिल? मी हो म्हणाले त्यावर त्यांनी विचारले हं सांग तुझे जबरदस्ती लग्न करण्याचे कारण? मी आवडलो नाही का तुला? मी, मला नेमकं सांगता येणार नाही असं उत्तर दिलं. बरं मग तुला दुसरं कोणी आवडतं का? मी म्हणाले हो सलमान खान. त्यावर ते जोरजोरात हसु लागले आणि म्हणाले छान, छान आहे हं तुझी आवड पण येडु तो फार मोठा आहे गं तुझ्या पेक्षा आणि इकडे माझ्याकडे बघ मी काही त्याच्यापेक्षा वाईट नाही. माझे सगळे मित्र मला सलमानच बोलतात. मी तोंडातल्या तोंडात पुटपूटले किती गैरसमज स्वत: बद्दल त्यांनी ते ऐकले आणि म्हणाले हो गैरसमज तर आहेत आणि स्वत:वर विश्वास तर त्याहून जास्त. आता माझं मन मला काय सांगत आहे सांगू? आपलं लग्न होणार शंभर टक्के होणार. खरं सांगायच तर मला तू आवडलीच आहेस आणि तूझ्या कडेही मला नकार देण्याचे काहि विशेष कारण नाही. पण मी सांगतो तू अजुनही लहाणच आहेस अचानक ठरलेल्या लग्नामुळे गोंधळली आहेस बाकी काही नाही, आई वडील नेहमिच आपलं भलं करतात.त्यांच्या निर्णयावर कधीच शंका घेऊ नकोस. मी आजवर खूप चांगला मुलगा, चांगला मित्र बनलो आहे मला खात्री आहे की, मी खूप चांगला पती हि बनेन आणि खरं सांगू मला खूप आवडेल तुझ्या या अश्या गोंधळलेल्या प्रवासाचा साक्षिदार व्हायला. मी शांतपणे त्यांच म्हणन ऐकत होती. तितक्यात आई ने कॉफी आणून दिली. मला गरम-गरमच कॉफी आवडते सवयी प्रमाणे मी कप उचलुन ओठांना लावला. थोडा पिऊन कप खाली ठेवला.

त्यांनी तोच कप उचलुन स्वत:च्या ओठांना लावला. मी पटकन बोलले निशीकांत तो माझा उष्टा कप आहे. ते त्यावर म्हणाले. हो, का तरीच म्हंटल कॉफी या आधी कधीच एवढी टेस्टी लागली नव्हती. मी लाजेने लालबुंद झाले. नजर चोरुन खाली उतरणार तितक्यात त्यांनी माझा हात पकडला आणि म्हणाले काय मग होकार ना ? मी त्यांच्या कडे पाहिलं आणि मोठ्याने ओारडुन बोलले नाही म्हणजे नाही आणि तिथुन पळ काढला. त्यानंतर ते खाली उतरुन आले आईचा निरोप घेऊन निघाले. कसे कोण जाणे पण माझे पाय आपसूकच माझ्या खोलीच्या खिडकीकडे वळले त्यांना पहायला. त्यांना कळु नये म्हणून पडद्या आड लपून पहात होते. त्यांनी गाडी रिव्हर्स घेतली माझ्या खोलीकडे हॉर्न दिला हसले आणि निघुन गेले. नाही हे शक्यच नव्हतं त्यांना मी तिथे उभी असलेली दिसणं. कसं कळाल असेल त्यांना? इतक्या कमी वेळात किती जास्त ओळखू लागले होते ते मला माझा तर विश्वासच बसत नव्हता. रात्री जेवता नाही त्यांचाच विचार करत होते. जेवण काय खाल्लं कसं खाल्ल काहिच कळत नव्हतं. खूप हरवल्या-हरवल्या सारखं वाटत होतं. निशिकांत शिवाय कोणाचाच विचार डोक्यात येत नव्हता. नंतर मी माझ्या खोलीत झोपायला गेले. बराच वेळ प्रयत्न केला पण झोप काही येईना, मग पुस्तक वाचायला घेतलं तरीही निशिकांत समोर दिसत होते. तितक्यात फोन वाजला, निशिकांतचा होता मी उचलुन फक्त कानाला लावला कदाचित मी त्याच फोनची वाट पहात होते. समोरुन ते बोलले माझा विचार करत आहेस ना? मी नकळत हो म्हणाले, नंतर नाही म्हणाले, मी का करू तुमचा विचार माझ्याकडे करण्या सारखी आणखी पुष्कळ कामे आहेत. ते म्हणाले, अच्छा होका मग मघाशी मी जाताना पडद्या आडुन मला पहात का होतीस? माझी तर काय बोलतीच बंद झाली होती. पुढे ते म्हणाले माधुरी मघाशी कॉफी पिताना तू माझं नाव घेतलस खूप छान वाटलं तुझ्या तोंडुन माझं नाव ऐकायला. ए पुन्हा एकदा बोलना मी पटकन म्हणाले, छे नाही हं काहीहि काय.ते हट्टच करु लागले माझी रिक्वेस्ट आहे बोलना प्लीज प्लीज प्लीज प्लीज,आणि तसंहि नाव असच घ्यायला सांगत आहे उखाण्यात नाही इतकी लाजतीयेस ती. मग मी म्हणाले अच्छा ठिक आहे.या आधी नाव घेतलं तेव्हा इतकं काहीच वाटलं नाही. पण, आता अचानक लाज वाटु लागली होती.मी अगदी हळु आवाजात त्यांच नावं घेतलं निशिकांत. त्यावर म्हणाले जरा मोठ्याने बोल, कि जेवली ही नाहीस आज माझ्या आठवणींत. आता मात्र मला थोडा



रागच आला किती मनमर्जी करावी माणसाने. मग मी रागानेच त्यांच नाव घेतलं. घ्या निशिकांत निशिकांत निशिकांत. बास ? त्यावर म्हणाले आहाहा याला म्हणतात आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन डोळे. माधुरी लग्नानंतरही असाच आवाज देशील ना?

त्यादिवशी आम्ही रात्रीच्या दोन वाजे पर्यंत गप्पा मारल्या आम्ही कसल्या ते एकटेच बडबडत होते. पण छान वाटत होतं ते सर्व ऐकायला. त्यांनी मला त्यांच्या लहान पणीच्या आठवणी, मीत्र, शाळा, कॉलेज, आई-बाबांचा स्वभाव, नातेवाईक, आवडते रंग, छंद, गाणी सारं सारं काही सांगीतलं. एवढं सगळं ऐकल्यावर ते मला जराही अनोळखी वाटत नव्हते. खर तर माझ्या मनातल्या त्यांच्या बद्दलच्या सर्व शंका त्यांनी हळुहळू दूर केल्या.दोन वाजत आलेले बघुन स्वत:च म्हणाले अरे बापरे दोन वाजले गं तुझ्या सोबत बोलतोना वेळ कसा गेला कळालच नाही छे. किती बडबडतेस मला तर जराही बोलु दीले नाहीस. मी इकडे गालातल्या गालात हसत होते. त्यांना ते कसे कळाले काय माहीत मला म्हणाले हसु आलं ना की माणसाने मनसोक्त हसावं, असं लपुन छपुन नाही. ते जे काही बोलायचे ते तेव्हा मलाही आवडु लागलं होतं. खर तर नुसतं बोलणच नाही तेही थोडे थोडे आवडु लागले होते.

पुढे काय माझं त्यांच्याच सोबत लग्न झालं ते थोडीच तसे ऐकणार होते माझ्या सोबत लग्न केल्याशिवाय. आज आमच्या लग्नाने एक वर्ष पुर्ण चा प्रवास केला भांडण एकदाही झालं नाही असं नाही. खरं सांगायच तर अधुन - मधुन मिच चीड चीड करत असते. जोरदार भांडुन रुसून माहेरी जायचं तर स्वप्नच आहे माझं. पण निशिकांत या जन्मी तरी ते शक्य होऊ देणार नाहीत.या पुढचा प्रवासही असाच सुखंमय व्हावा हिच ईश्वर चरणी प्रार्थना. सासु-सासरेच आता माझे आई- बाबा आहेत. माहेरची आठवणही होत नाही आता मला. खरचं निशीकांत बोललेले ते खरं होतं. आई वडील नेहमिच आपल्या चांगल्याचा विचार करतात.

निशिकांत ने आजवर मला खुप काही दिले आज मी खुप सुखात आहे. आजच आमच्या लग्नाचा पहीला वाढदिवस मीहि आज त्यांना एक गीफ्ट देणार आहे. लवकरच आमच्याकडे एक पाहुणा येणार आहे. हो मी निशिकांतच्या बाळाची आई होणार आहे. हे कळाल्या नंतरची त्यांची जी काही प्रतिक्रीया असेल ती पहाण्यासाठी खुप अधीर झाली आहे मी.

मला बालीश म्हणणारा माझा वेडा नवरा स्वत: एखाद्या लहान मुला पेक्षा कमी नाही. लग्न करुन आल्यावर मी मोठी होत गेले आणि ते लहान. आता काय दोन पिल्ल संभाळताना माझी भारी दमछाक होणार आहे.

होते मी वेंधळी अल्लड
स्वत: मध्ये रमणारी,
दिशा हरवलेल्या आकाशामध्ये
स्वच्छंदे उडणारी.
तुझ्या येण्याने ख-या अर्थाने
जगण्याचे अर्थ कळाले,
दिशा हरवलेल्या पक्षाला
तू अलवार तुझ्या पंखांखाली घर दीले.
तू सावरलस, तू स्थिरावलस
तू संभाळून घेतलस सारं,
गोंधळलेल्या माझ्या सारख्या पाखराला कधीच वाटले नाही परके हे घरं.

आता मात्र तुझ्या सोबत क्षितिजा पर्यंत जायचे आहे, आयुष्याच्या प्रत्येक वळणावर तुला डोळे भरुन पहायचे आहे...

डॉ. सुनील इनामदार, संग्रहक, ९८२३०३४४३४.



यंदा पाऊसकाळ चांगला असून हवामान खात्यानेही यावर्षी पाऊसकाळ चांगला असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे, शेतकरी सुखावला असून मान्सूनच्या आगमनाने समाधानाचे वातावरण आहे. पहिल्याच पावसानंतर लातूरमधील रेणा मध्यम प्रकल्पात तब्बल २० ते २२ टक्के पाणीसाठ्यात वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहेत. रेणा नदीवरील चार बंधारे पाणी संचय पातळीवरुन वाहत आहेत. त्यामुळे, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दुसरीकडे मांजरा नदीवरील वांगदरी या ठिकाणचे बॅरेजेस भरून वाहत आहेत, याबद्दल आमदार धीरज देशमुख यांनी ट्विट करुन आनंद व्यक्त केला.

# 'नीट'चे पावित्र्य भंग-सुप्रीम कोर्ट

**सरकारने उत्तर द्यावे- सुप्रीम कोर्ट:ही नीट स्वच्छ आहे का ?**

नवी दिल्ली - सर्वोच्च न्यायालयाने नीट-यूजी २०२४ च्या परीक्षेतील पेपरफुटी, ग्रेस गुणांसह इतर गैरप्रकारांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. न्यायमूर्ती विक्रमनाथ व न्यायमूर्ती ए. अमानुल्लाह यांचे खंडपीठ म्हणाले, याचा परिणाम परीक्षेच्या पावित्र्यावर झाला आहे. आम्हाला उत्तर हवे आहे. न्यायालयाने केंद्र सरकार आणि परीक्षा घेणारी यंत्रणा नॅशनल टेस्टिंग एजन्सीला (एनटीए) चार आठवड्यांत उत्तर मागितले आहे. प्रकरणाची पुढील सुनावणी ८ जुलै रोजी होणार आहे. तथापि, न्यायालयाने तूर्तास समुपदेशनावर बंदी घालण्यास नकार दिला आहे.




परीक्षा देणारी विद्यार्थिनी शिवांगी मिश्रा व इतरांनी पेपर फुटल्याचा आरोप करत १ जून रोजी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली. मंगळवारी वकीलाने परीक्षा पुन्हा घेण्याची आणि गैप्रकाराची चौकशी करण्याची मागणी केली. तथापि, एनटीएने सांगितले की, परीक्षा योग्य आहे. जे आरोप केले आहेत तसे होणे इतके सोपे नाही. त्यावर कोर्ट म्हणाले, 'तुम्ही (एनटीए) परीक्षा घेतली म्हणून ती योग्य आहे असे नाही म्हणता येणार. न्यायालयात इतर पाच याचिकादेखील आहेत.

पेपर फुटला, अनेक राज्यांत कारवाई

१६ मे रोजी एका विद्यार्थिनीने बिहार, उत्तर प्रदेश आणि इतर राज्यांमध्ये पेपरफुटी झाल्याच्या वृत्तांचा हवाला देत पुन्हा नीट परीक्षा घेण्याची आणि चौकशीची याचिका दाखल केली. सरन्यायाधीशांनी १७ मे रोजी केंद्र तथा एनटीएला उत्तर मागितले होते.

आज सहाव्या याचिकेवर सुनावणी शक्य; या प्रकरणात सहावी याचिकाही दाखल झाली.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT